खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर
साथ देवो न देवो,
परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध
कायम आयुष्यभर साथ देतात.

वर्ष : ०५ | अंक : १७५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०६ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठी रक्कम; केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, पुणे :** यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला कर हस्तांतरणातून ९८ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्राच्या मदतीने राबवल्या जाणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी अतिरिक्त १२ हजार ३५५ कोटी रुपये मिळणार आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला एकूण एक लाख दहा हजार ६६१ कोटी रुपये मिळतील. इतकी मोठी रक्कम महाराष्ट्राला कधीही मिळाली नव्हती,' असा दावा माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी बुधवारी केला.



यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत भारतीय जनता पक्षाच्या शहर कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शहराध्यक्ष धीरज घाटे, सरचिटणीस प्रियांका शेंडगे-शिंदे, समीर रुपदे आदी उपस्थित होते. 'जीएसटी' लागू झाल्यानंतर कर विभाजनातून राज्यांना मोठा निधी मिळत आहे. तत्पूर्वी ' संयुक्त पुरोगामी आघाडी 'चे सरकार असताना राज्यांना फक्त ३२ टक्के निधी मिळत होता. मोदी सरकारने हे प्रमाण ४१ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. महाराष्ट्राला 'जीएसटी' हिश्श्यापोटी ९८ हजार कोटी रुपये मिळतील. ग्रामीण रस्ते, कृषी, आर्थिक क्लस्टर्स, आरोग्यसेवा, सिंचन, कृषी ग्रामीण विकास, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, रेल्वे, मुंबई व इतर ठिकाणचे मेट्रो प्रकल्प यांतून महाराष्ट्राला अतिरिक्त १२ हजार ३५५ कोटी रुपये मिळतील. त्यामुळे एकूण अर्थसंकल्पातून महाराष्ट्र राज्याला एक लाख १० हजार ६६१ कोटी रुपये मिळतील,' असे प्रकाश जावडेकर यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अधिक किंमत मिळणारी पिके, पिकांचे वैविध्य यांवर भर दिला आहे. लघु व मध्यम उद्योगांसाठी दहा हजार कोटींचा 'एसएमई ग्रोथ फंड' प्रस्तावित केला आहे. 'नारी शक्ती'ला बळ देण्यासाठी बचत गटांना भरीव अर्थसाह्य केले जाणार आहे,' असे जावडेकर म्हणाले.

**प्रकाश जावडेकर म्हणाले...**
- यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा लोकाभिमुख, विकासाभिमुख, प्रगतिशील.
- हा अर्थसंकल्प विकसित, आत्मनिर्भर भारताचा पाया.
- भारताला तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनविण्यासाठीचा हा संकल्प.
- सेमीकंडक्टर मिशन २.०, बायोफार्मा शक्तीमधून क्रांती घडेल.
- ऑरेंज इकॉनॉमी' मधून सर्जनशीलता व डिजिटल कौशल्यांना गती.

## बल्लारपूर तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती

### सरपंचासह १०६ सदस्य बसले घरी : जि.प.व पं.स. सोबत आता ग्रामपंचायतवर प्रशासकराज

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, विसापूर (चंद्रपूर) :** मागील चार वर्षापासून जिल्हा परिषद व पंचायत समिती चा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. आता पुन्हा ग्रामपंचायतवर देखील प्रशासकराज आले आहे. बल्लारपूर तालुक्यात एकूण १७ ग्रामपंचायती आहे. यापैकी १२ ग्राम पंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती आला आहे. यामुळे १२ सरपंचासह १०६ सदस्यांना घरी बसण्याची पाळी आली आहे. बल्लारपूर तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या विसापूर ग्रामपंचायत मुदत ५ फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात आली आहे. यामुळे येथे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी प्रशासक म्हणून कारभार करणार आहे. तालुक्यातील नांदगाव (पोडे), मानोरा, कळमना, हडस्ती, पळसगाव, कोर्टीमक्ता, गिलबीली, आमडी, किन्ही येथील ग्रामपंचायतीची मुदत देखील ४ फेब्रुवारी २०२६ रोजी संपुष्टात आली आहे. त्याचप्रमाणे लावारी व दहेली या ग्रामपंचायतीची मुदत ६ आगस्ट २०२४ रोजी संपली आहे. यामुळे या सर्व ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती गेला आहे. लावारी, दहेली, आमडी, किन्ही, हडस्ती व कोर्टीमक्ता येथील प्रत्येकी ७ असे एकूण ४२ सदस्य, मानोरा, कळमना, गिलबीली व पळसगाव येथील प्रत्येकी ९ असे एकूण ३६ सदस्य, नांदगाव (पोडे) येथील ११ व विसापूर येथील १७ असे एकूण सरपंचासह १०६ सदस्यांचा कारभार आता प्रशासक सांभाळणार आहे.

ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत असी त्रि:सूत्री व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. मात्र, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक लांबल्याने चार वर्षापासून प्रशासकराज आहे. आता या मालिकेत ग्रामपंचायतीचा समावेश झाल्यामुळे ग्रामीण विकासाचा डोलारा प्रशासकीय व्यवस्था हाकणार आहे. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक किमान वर्षभर लांबणीवर जाण्याची शक्यता जाणकार व्यक्त करत आहे.



## लाडकी बहिण योजना बंद पडणार नाही - गुलाबराव पाटील



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.०५, सिल्लोड :** उपमुख्यमंत्री म्हणून जोपर्यंत एकनाथ शिंदे आहेत. तोपर्यंत लाडकी बहिण योजना बंद पडणार नाही, बहिणींचा रुबाब वाढबिण्याचे काम शिंदेसेनेनेच केले आहे. ही योजना शिवसेनेचीच आहे असे त्यांनी गुरुवारी (ता.५)जरंडी येथील प्रचार सभेत ठणकावून सांगितले तसेच राज्यातील अपूर्ण पाणी पुरवठ्याच्या योजना दोन वर्षात पूर्ण करणार असून निधीची टंचाई आहे. त्यामुळे या योजनांचे काम अपूर्ण आहे. आगामी दोन वर्षात सर्व पाणी पुरवठा योजना पूर्ण होतील. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड, वैजापूर येथे वॉटर ग्रीडसाठी २७०० कोटी निधीं मंजूर केला असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये महायुतीमधील भाऊ भाऊच विरोधात आहे. परंतु आम्ही जर गुवाहाटीला जाऊन टांगा पलटी केला नसता तर तुम्हाला ही हे दिवस आले नसते असाही टोला त्यांनी सभेतून भाजपला लागवला. गुरुवारी सायंकाळी सहा वाजता शिंदेसेनेच्या आमखेडा गट, आमखेडा गण, निंबायती गणातील उमेदवारांच्या प्रचारार्थ जरंडी येथे पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील बोलत होते. यावेळी माजी मंत्री अर्जुन खोतकर, आ.अब्दुल सत्तार यांनी मनोगत व्यक्त केले. उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे, राजेंद्र राठोड, सोपान गव्हांडे, विजय काळे, बंटी काळे, विष्णू वाघ, उत्तम गवळे आदींसह आमखेडा गटातील, गणातील व निंबायती गणातील शिंदेसेनेची उमेदवार यांची उपस्थिती होती.

## तलासरीत गांजा साठ्यावर मोठी कारवाई २ आरोपी अटक !

### पालघर पोलिसांकडून २.९६५ किलो अंमली पदार्थ जप्त

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५ तलासरी (पालघर) :** पालघर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या अंमली पदार्थविरोधी कडक धोरणानुसार जिल्ह्यात धडक कारवाया सुरू असून तलासरी पोलिसांनी गांजा साठवणूक करणाऱ्या दोन आरोपींना अटक केली आहे. दि. ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी तलासरी पोलीस ठाण्यास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, संभा इराणी फार्म या वाडीमध्ये एका इसमाने विक्रीसाठी गांजा लपवून ठेवलेला आहे.

या माहितीनुसार पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय गोरड यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने अमगाव चौकी हद्दीतील मौजे संभा येथील इराणी फार्मवरील घरावर छापा टाकला. झडतीदरम्यान २.९६५ किलो वजनाचा फिकट तपकिरी रंगाचा, पाने-फुले-काड्या व बिया मिश्रित, उग्र वास असलेला गांजा सदृश्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.



या प्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गुरनं २८/२०२६ अन्वये एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २०(ब), र(ब) प्रमाणे दि. ०४/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपी १) मोहम्मद चंगेज हाजी अब्दुल रौफ शेख ऊर्फ मोईन्नुदीन रौफ शेख (वय ३६, रा. फॉरेस्ट ऑफिसजवळ, संजाण, ता. उंबरगांव, जि. बलसाड) आणि २) अतिश गणेश कुमरे (वय २८, रा. स्वप्नलोक माणिक अपार्टमेंट, उंबरगांव, जि. बलसाड) यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल चिंधे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोनि अजय गोरड, पोउपनि विकास दरगुडे, पोउपनि अमोल चिंधे, श्रेणी पोउपनि जयराम उमतोल, सपोउपनि हिरामण खोटरे, पोहवा प्रमोद पाटील, पोहवा रविंद भगत, पोना देवा कडु, पोना सदु भेस्कर तसेच फॉरेन्सिक पथकातील अधिकारी-अंमलदार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पालघर जिल्ह्यात अंमली पदार्थ तस्करी व विक्रीविरोधात पोलिसांची मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## नाशिकमध्ये राजकीय भूकंप? मनसेची शिवसेना शिंदे गटासोबत युती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, नाशिक :** नाशिकमध्ये उद्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक पार पडणार आहे. याच पार्श्वभूमीवर आता नाशिकमध्ये राजकीय घडामोडींना वेग आला आहे. नाशिकमध्ये भाजपचे ७२ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे भाजपकडे महापौर-उपमहापौर पदासाठी एक हाती सत्ता आहे. यातच आज भाजपकडून खबरदारी म्हणून सर्व नगरसेवकांची अज्ञातस्थळी सहल काढण्यात आली आहे. कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी भाजपकडून काळजी काळजी घेतली जात आहे. दुसरीकडे भाजपचा मित्रपक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने नाशिकमध्ये आज मनसे सोबत युती करत नवीन गट स्थापन केला आहे. दरम्यान, नाशिकमध्ये शिंदे गट आणि भाजप एकमेकांच्या विरोधात निवडूक लढले आहेत.

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) आणि मनसे पक्षाच्या नगरसेवकांचे संख्याबळ जर पाहिलं तर शिंदे गटाकडे एकूण २६ नगरसेवक आहेत तर मनसेकडे १ नगरसेवक अशी संख्या आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांची युती होण्याची चर्चा असतानाच शिवसेना (शिंदे गट) आणि मनसेने नाशिकमध्ये युती करत शहर विकास आघाडी हा नवीन गट स्थापन केला आहे. त्यांच्या युतीमुळे नाशिकमध्ये राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. महापालिकेतील समित्यांबाबतचे गणित यामुळे बिघडण्याची शक्यता आहे. इतर पक्षांच्या नगरसेवक संख्येचा विचार केला तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ४ नगरसेवक, उबाठा १५, काँग्रेस ३, अपक्ष १ अशी पक्षनिहाय नगरसेवकांची संख्या आहे.

शिवसेना ठाकरे गटासोबत महापालिका निवडणुकीत लढलेल्या मनसेने महापौर निवडणुकीच्या काही तासांआधीच शिवसेना शिंदे गटासोबत हात मिळवणी केल्याने महापालिकेतील भाजपचे विविध समिती आणि स्थायी समितीच गणित कुठे तरी बिघडणार असल्याची चर्चा आहे.





या घडामोडींवर शिंदे गटाचे उपनेता तथा जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी मनसेचे जिल्हा अध्यक्ष अंकुश पवार यांच्या काही दिवस संपर्कात होतो,त्यांना विनंती केली होती आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने आपण एकत्र यावे त्या गोष्टीला दाद देत मनसे एकत्र आली असून आपण त्यांचे स्वागत करतो. या संपूर्ण यांच्यात सिंहाचा वाटा असेल तो म्हणजे शिवसेनेचे सचिव नरेश म्हस्के यांचा असून, त्यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे ही यश लाभले आहे, अशी प्रतिक्रिया अजय बोरस्ते यांनी दिली.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेसवरील..तीन तासाचा प्रवास तीस तासावर...? सरकारच्या विकासाचे तीन-तेरा वाजले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे म्हणजे वाहतुकीचा अखंड कोसळणारा धबधबा आहे. मुंबई ते पुणे अवघ्या तीन तासांवर आणण्याचे संपूर्ण श्रेय या एक्स्प्रेस वेला जाते. पण मंगळवारच्या दुर्घटनेनंतर हा प्रवास ३ तासांऐवजी ३० तासांचा झाल्याने विकासाचे कसे तीनतेरा झाले आहेत, ही बाब ठळकपणे समोर आली आहे. मंगळवारी ३ फेब्रवारी रोजी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास खंडाळा घाटामधील आडोशी बोगद्याजवळ रसायन वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात होतो आणि टँकर पलटी होतो आणि तेव्हापासून पुण्याहून मुंबईच्या दिशेची वाहतूक ठप्प होते. याकडे कुणीही गांभीर्याने न पाहिल्याने तब्बल २५ किलोमीटर लांबीची वाहनांची रांग लागणे, हजारो लोकांचा खोळंबा होणे याला जबाबदार कोण, याचे उत्तर महाराष्ट्राला मिळायला हवे. तसेच ३० तासांनंतरही वाहतूक सुरळीत होऊ शकली नाही हे अपयश कुणाचे, असा गंभीर प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. मुंबई-पुणे महामार्गावर अनेकदा वाहतूक कोंडी होते. कधी १०-१५ मिनिटे तर कधी तास-दीडतास. मात्र, मंगळवार संध्याकाळपासून ठप्प झालेली वाहतूक संथगतीने सुरू व्हायला २४ तास लागत असतील तर वाहतूक व्यवस्थापनाबाबत सरकार किती बेफिकीर आहे, हे दाहक वास्तव समोर येते.

या महामार्गावर अपघात, गाड्या पलटी होणे हे काही नवीन नाही. मात्र, त्यावर तातडीने उपाययोजना होणेही गरजेचे आहे. अपघातानंतर गाड्या जागेवरून हलवून वाहतूक सुरळीत केली जाते. तरीही दीड-दोन तासांचा खोळंबा होतोच मात्र, ३० तासांनंतरही वाहतूक पूर्ववत होत नसेल तर सरकारने वाहतूक (ट्रान्सपोर्टेशन) धोरण चुकल्याचे मान्य करून तातडीने चूक दुरुस्त करायला हवी. सर्वात गंभीर बाब म्हणजे टँकर पलटल्यानंतर त्याची दखल तातडीने घेतली गेली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी होत गेली. बरं दखल घेतल्यानंतर उपाययोजना काय करणार हा प्रश्नच होता. रसायन हवेत पसरते तेव्हा त्यावर काय उपाययोजना करावी, याची महामार्गाचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपनीकडे



तजवीज नाही, हीच आश्चर्याची बाब आहे. त्यामुळे भरमसाठ टोल आकारून पश्चाताप करावा लागतो, ही हजारो प्रवाशांची संतप्त प्रतिक्रिया खूप काही सांगून जाते. बेफिकीरीचा सर्वात उत्तम नमुना म्हणजे अशी दुर्घटना घडली तर याची माहिती प्रवाशापर्यंत आणि वाहनचालकांपर्यंत पोहोचवण्याची कोणतीही सोय नाही. त्यामुळे वाहने येतच होती आणि वाहतूक कोंडीत भर टाकत होती.

त्यामुळे वाहनांची २०-२५ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या. वास्तविक अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेची चर्चा होत असताना या बाबींचा विचार व्हायला हवा. मात्र, रस्ता बांधला, टोल वसुली सुरू झाली की सगळे झाले,हीच आपली विकासाची व्याख्या ठरली आहे. या वाहतूक कोंडीत हजारो लोकांची किती गैरसोय झाली याचा सरकारने विचार केला आहे का ? त्यांना अन्नपाण्यावाचून राहावे




लागले, लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या वाट्याला काय आले, याचा विचार तरी सरकारने केला का? वाहतूक कोंडीत अडकलेल्या महिला, ज्येष्ठांचे शौचालयाशिवाय किती हाल झाले असतील, वाहनचालक झोपू शकत नाही आणि गाडी सोडू शकत नाही त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा किती ताण त्यांच्यावर पडला असेल, याची जाणीव सरकारला आहे का? एवढंच नाही तर चालक सीट सोडून जाऊ शकत नव्हता त्यामुळे त्याचेही किती शारीरिक हाल झाले असतील, याचा विचार केला तरी त्रास होईल. मात्र, सरकारला याची जाणीव आहे का, हाच खरा प्रश्न आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सायंकाळी उशिरा या घटनेची दखल घेत याबाबत चौकशीचे आदेश दिल्याचे समजते. तर, बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील याबाबत गंभीर दखल घेत आपत्कालीन परिस्थितीत वाहतूक आराखडा तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. बाकीच्या नेत्यांना तर महामार्ग सुरू आहे की बंद आहे, याविषयी काहीही देणेघेणे नव्हते. त्यामुळे बुधवारी सकाळी वाहनांच्या रांगा पाहून संपूर्ण महाराष्ट्राला या घटनेचे गांभीर्य कळले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा मुंबई-पुण्याला जोडणारा तसेच पश्चिम महाराष्ट्रासह दक्षिण भारताला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. आधीच्या मुंबई-पुणे महामार्गाच्या खंडाळा घाटातून नागमोडी प्रवासाला चार ते सहा तास लागायचे. मात्र, एक्स्प्रेस वेमुळे हा प्रवास अडीच ते तीन तासांवर आला. मात्र, मंगळवारसारखी दुर्घटना झाल्यास त्या कठीण प्रसंगातून मार्ग कसा काढायचा याचा विचारच करण्यात आलेला नाही, ही बाब या निमित्ताने उघड झाली आहे. वास्तविक रसायनाचा टँकर उलटल्यामुळे आणि त्यातून रसायन हवेत मिसळत असल्याने ते घातक होते. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक आधीच इतर मार्गाने वळवायला हवी होती. त्यासाठी संपूर्ण एक्स्प्रेस वेवरील पोलिसांना अलर्ट करायला हवे होते. त्याचवेळी वाहनचालकांना अशा घटनांची माहिती मिळेल आणि पर्यायी मार्गाचा अवलंब करतील, अशी व्यवस्था हवी. ही जबाबदारी टोल वसुली करणाऱ्या आयआरबी कंपनीची होती. मात्र, आपल्याकडील वाहतूक व्यवस्थापन प्रचंड ढिसाळ आणि सर्वात दुर्लक्षित आहे. वाहतुकीचा प्रचंड गोंधळ सुरू असतानाही कंपनीकडून टोलवसुली सुरू होती. एकूणच आपल्याकडील वाहतूक व्यवस्थेचा पुरता बँड वाजल्याचे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील दुर्घटनेने दाखवून दिले आहे. यातून धडा घ्यायचा की थातूरमातूर कारणे सांगून वेळ मारून न्यायची, याचा निर्णय सरकारने घ्यायचा आहे.

## गानकोकिळा लता मंगेशकर



आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलिट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# 'व्हॅलेंटाईन वीक' - युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा सप्ताह

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने




मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.

या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## मिटिंग

जवळ केली दिल्ली
चालू करायचे सेटिंग
बंददाराआड जोरात
मिटींग मागून मिटींग

चपखल बसे भरोसा
अशीचं करा फिटींग
अशी जमवावी गर्दी
झुकू लागतीलं धटिंग

आंत काय चाललेयं
बाहेर लागली बेटिंग
विरोधात उभे राहती
आधीचं त्यांचीकटिंग

राजकारणात चालते
रे छोटी मोठी चिटींग
भिंतीला असूद्या तडे
आकर्षक हवी पेंटिग

एकामागून खूप जथे
लांबडी लिस्ट वेटिंग
कौशल्य येते कामास
कुणाशीजमेलं वेडिंग

पक्षातयायला उत्सुक
बेल वाजवी टिंग टिंग
काहीही कराया लावी
सत्तेची आगळी झिंग

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# पनवेल मनपाची विशेष स्वच्छता मोहीम



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०५, पनवेल :** शहरात स्वच्छ, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत 'सघन घनकचरा व्यवस्थापन व विशेष स्वच्छता मोहीम' युद्धपातळीवर राबविण्यात आली. जानेवारी २०२६ च्या अखेरच्या आठवड्यात शहरातील विविध प्रभागांमध्ये यांत्रिक साधने, हायवा, जेसीबी आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाच्या सहाय्याने स्वच्छतेचा व्यापक 'ड्राइव्ह' राबविण्यात आला.या विशेष स्वच्छता मोहीमेंतर्गत वडाळे तलाव, कोळीवाडा, खांदा कॉलनी, कामोठे, खारघर आणि कळंबोली या भागांत हायवा, जेसीबी आणि टिपर वाहनांच्या साहाय्याने स्वच्छता करण्यात आल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली. या मोहिमेमुळे रस्त्यांवरील धुळीचे प्रमाण कमी होऊन नागरिकांच्या आरोग्यास पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

**विशेष स्वच्छता मोहीमेची प्रमुख वैशिष्ट्ये :-**

१. हायवा वाहनांद्वारे कचरा निर्मूलन : घनकचरा आणि राडारोडा (डेब्रिज) उचलण्यासाठी 'हायवा' वाहनांचा प्रभावी वापर करण्यात आला. नुकत्याच झालेल्या या मोहिमेमध्ये वडाळे तलाव, कोळीवाडा, कामोठे सेक्टर-२१ आणि खांदा कॉलनी या भागांतून मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा हटवून परिसर मोकळा करण्यात आला.

२. जेसीबीद्वारे सखोल साफसफाई : रस्त्यालगत साचलेली माती, नाल्यांतील गाळ आणि बांधकामजन्य कचरा हटवण्यासाठी जेसीबी मशीनचा वापर दोन सत्रांत करण्यात आला. विशेषतः सेक्टर- २ई, वडाळे तलाव, कोळीवाडा आणि कामोठे परिसरात दररोज ७ ते ९ तास जेसीबीद्वारे सखोल स्वच्छता करण्यात आली.

३. टिपर वाहनांद्वारे नियमित संकलन : घरगुती आणि परिसरातील कचरा उचलण्यासाठी टिपर वाहनांची पूर्णवेळ सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. सेक्टर- १२ (शिव मंदिर व ख्रिश्चन दफनभूमी परिसर), राजीव गांधी मैदान आणि कळंबोली (जाधववाडी) या भागांत दररोज कचरा संकलन व वाहतूक करण्यात आली.

४. १०० हून अधिक स्वच्छतादूत मैदानात : या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे दररोज १०८ ते ११९ स्वच्छताकर्मी प्रत्यक्ष मैदानात उतरले होते. वडाळे तलाव परिसरात सर्वाधिक (४३ ते ४६) कर्मचारी तैनात करण्यात आले होते, तर खांदा कॉलनी, खारघर, कळंबोली आणि भारत नगर परिसरात ही मोठ्या संख्येने मनुष्यबळ कार्यरत होते.

**मोहिमेचे सकारात्मक परिणाम :**

रस्त्यांवरील धूळ, माती आणि साचलेल्या कचऱ्यात लक्षणीय घट. मोकळ्या जागा आणि नाल्यांची प्रभावी स्वच्छता. नागरिकांच्या आरोग्यासाठी पोषक आणि दुर्गंधी मुक्त वातावरण निर्मिती.संकलित कचऱ्याचा तपशील : कचरा व राडारोडा: सुमारे ८० टन मिश्र कचरा व राडारोडा संकलित. धूळ व माती: रस्त्यांच्या कडेला साचलेली २१ टन धूळ जेसीबी व मनुष्यबळाद्वारे काढली. जलपर्णी: वडाळे तलाव परिसरातून १५ टन जलपर्णी काढून तलावाची स्वच्छता केली.आधुनिक यंत्रसामग्री, नियोजनबद्ध मनुष्यबळ आणि नियमित देखरेख या त्रिसूत्रीवर महापालिका भर देत आहे. पनवेलला कचरामुक्त करण्यासाठी भविष्यातही अशाच प्रकारच्या सघन स्वच्छता मोहिमा सातत्याने राबविल्या जातील, असे मनपा आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे.

# राज्य निवडणूक आयुक्तांची राष्ट्रीय परिषद २४ फेब्रुवारीस नवी दिल्लीत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** भारत निवडणूक आयोगाच्या (ECI) वतीने राज्य निवडणूक आयुक्तांची (State Election CommissioneA°s - SECs) राष्ट्रीय परिषद २४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आली आहे. देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांतील राज्य निवडणूक आयुक्त या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, ही राष्ट्रीय परिषद २५ वर्षांहून अधिक कालावधीनंतर होत असून, यापूर्वी अशी परिषद १९९९ साली आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार भूषवणार असून, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ.विवेक जोशी यांची ही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. परिषदेत राज्य निवडणूक आयुक्तांसह त्यांचे कायदेशीर व तांत्रिक तज्ज्ञ सहभागी होणार असून, निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. याशिवाय भारत निवडणूक आयोगाचे सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी (CEO) देखील या राष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचा मुख्य उद्देश भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगांमध्ये त्यांच्या-त्यांच्या कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया व व्यवस्थापनाबाबत समन्वय (synergy) अधिक मजबूत करणे हा आहे. परिषदेदरम्यान राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मतदार पात्रतेसंबंधी निवडणूक कायदे, भारत निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या एउखछएढ या डिजिटल प्लॅटफॉर्मसह तांत्रिक नवकल्पना, तसेच ईव्हीएम (EVM) यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत.

भारत निवडणूक आयोग संविधान व देशातील कायदेशीर तरतुदींनुसार मतदार यादी तयार करणे व निवडणुका पार पाडण्याचा आपला व्यापक अनुभव या परिषदेत राज्य निवडणूक आयोगांशी सामायिक करणार आहे. राज्य निवडणूक आयोगांची स्थापना ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती तरतुदींनुसार संबंधित राज्यांच्या कायद्यांद्वारे करण्यात आली असून, पंचायत व नगरपालिका संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणे तसेच निवडणुकांचे संचालन, दिशा व नियंत्रण ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगांवर सोपवण्यात आली आहे, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# पु.ल.कट्ट्यावर लतादीदींच्या सूरांचा आज जागर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीकडून आयोजित करण्यात येणाऱ्या'पु.ल.कट्टा'या उपक्रमाअंतर्गत भारतरत्न लता मंगेशकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आवाजातील अजरामर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या प्रांगणातील खुल्या रंगमंचावर या कार्यक्रमाचे सादरीकरण शुक्रवार,६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.लता मंगेशकर यांनी गायलेली निवडक लोकप्रिय आणि भावस्पर्शी गीते आणि त्यांच्या अतुलनीय कारकीर्दीवरील मान्यवरांची मनोगतेही दृकश्राव्य स्वरूपात सादर होतील. त्याचबरोबर,ज्येष्ठ संगीत रसिक,नौशाद संगीत समितीचे काका जे. पी. यांच्याकडून दीदींच्या आयुष्यातील काही दुर्मीळ आठवणी,प्रसंग प्रत्यक्ष ऐकायला मिळतील. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून सर्व संगीतप्रेमी आणि रसिकांसाठी हा कार्यक्रम खुला आहे. कलेचा आनंद,विचारांची मेजवानी आणि सुरांची मैफल अनुभवण्यासाठी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन पु. ल. देशपांडे महाराष्ट्र अकादमीकडून करण्यात येत आहे.

# शिर्डी परिक्रमेसाठी भाविकांच्या सुरक्षेला व आरोग्य सुविधांना सर्वोच्च प्राधान्य द्या, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, शिर्डी :** आगामी १३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शिर्डी साई परिक्रमेदरम्यान भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी काटेकोर नियोजन करावे. भाविकांच्या सुरक्षिततेसह आरोग्य व स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देत परिक्रमा मार्गावर आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिल्या. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी परिक्रमेदरम्यान डीजे व फिरत्या साऊंड सिस्टीमवर कडक निर्बंध असून केवळ निश्चित ठिकाणी स्थिर स्वरूपात भजन व पारंपरिक वाद्य वादनास परवानगी द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.



शिर्डी परिक्रमा नियोजनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय महसूल अधिकारी माणिक आहेर, किरण सावंत पाटील, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, तहसीलदार अमोल मोरे, साई संस्थान प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, गटविकास अधिकारी विवेक गुंड यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

श्री. कोळेकर म्हणाले, परिक्रमा मार्गावर अन्नदान करणाऱ्या स्टॉलधारकांनी कचरा व्यवस्थापनाचे काटेकोर पालन करावे. कचरा संकलनासाठी डस्टबिन व मोठ्या ड्रमची व्यवस्था करून प्लास्टिक बाटल्या व कचरा तत्परतेने जमा करावा. नगरपालिकेने परिक्रमा मार्गावरील रस्ते, स्वच्छता व पथदिव्यांची दुरुस्ती वेगाने पूर्ण करावी, तसेच सेंट लॉर्न हॉटेल ते एसटीपी मार्गावरील अरुंद रस्त्याच्या बाजूला मुरूम टाकून सपाटीकरण करावे.

महावितरणने भाविकांच्या सुरक्षिततेसाठी लोंबकळणाऱ्या विद्युत तारांची उंची वाढवावी, अंधार असलेल्या भागात हॅलोजन दिवे लावावेत व आवश्यक तेथे कर्मचारी नियुक्त करावेत.

भाविकांच्या आरोग्यासाठी परिक्रमा मार्गावर १० रुग्णवाहिका, फिरती वैद्यकीय पथके व ओआरएस केंद्रे तैनात ठेवावीत. महिला भाविकांची कुचंबणा होऊ नये यासाठी मार्गावर ठिकठिकाणी फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी व ती राखीव ठेवावीत. १२ तारखेला वाहतूक बंदी लागू होण्यापूर्वीच पाण्याचे टँकर व पुरेसा पाणीसाठा उपलब्ध करून द्यावा. साकोरी शिवारातील वीटभट्ट्या व स्टोन क्रशरमुळे होणारी धूळ व चिखल टाळण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी परिक्रमेच्या दोन-तीन दिवस आधी कामकाज व वाहतूक बंद ठेवावी. तसेच परिक्रमा मार्गक्रमण झाल्यानंतर त्वरित साफसफाई करण्यासाठी विशेष पथके व घंटागाड्यांची सोय करावी. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नगर-मनमाड महामार्गावरील वाहतूक पर्यायी रिंग रोडने वळविण्याचे नियोजन करावे. भाविकांच्या वाहनांसाठी संस्थानच्या व खासगी मोकळ्या जागांवर विनामूल्य पार्किंग उपलब्ध करून दिशादर्शक फलक लावावेत.

रस्त्याच्या कडेला असलेल्या रक्षक दगडांवर रिफ्लेक्टर बसवावेत. पोलीस प्रशासनाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करावी व राज्य उत्पादन शुल्क विभागाने १२ तारखेला मद्यविक्री बंद (ड्राय डे) पाळण्याबाबत दक्षता घ्यावी, असेही श्री.कोळेकर यांनी सांगितले.

ग्रामपंचायतींनी स्वागत कमानींऐवजी स्वागत मंच उभारावेत. भविष्यातील नियोजनासाठी नगररचना विभागाने परिक्रमा मार्गाचे ३० मीटर रुंदीकरण करण्यासाठी मोजणी करावी व गर्दीचा ताण कमी करण्यासाठी परिक्रमेचा प्रारंभ बिंदू महामार्गाऐवजी पश्चिम बाजूस नेण्याबाबत आराखडा तयार करावा, अशा सूचनाही श्री. कोळेकर यांनी दिल्या.

श्री.गाडीलकर म्हणाले, गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी खंडोबा मंदिर परिसरात मोठी एलईडी स्क्रीन उभारावी व आरतीनंतर सकाळी ५:४० वाजता रथाचे प्रस्थान होईल याचे नियोजन करावे. कृषी विभागाने शासकीय योजनांचे प्रसिद्धी फलक सुरक्षितरीत्या लावावेत. यावेळी ग्रीन अ‍ॅण्ड क्लीन शिर्डी फौंडेशनचे अजित पारख यांनी शिर्डी परिक्रमा आराखड्याचे सादरीकरण केले. भविष्यातील परिक्रमा मार्ग कसा असावा, याचे संकल्पचित्र स्पष्ट करणारी ध्वनिचित्रफीत यावेळी सादर करण्यात आली.

# विकास कामातील भ्रष्टाचाराच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्याचे उपोषण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील देऊळगाव कंडुपाळ गावातील विकासकामांमध्ये झालेल्या भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जाची कामे व ठेकेदारांच्या मनमनी विरोधात ग्रामपंचायत सदस्या नंदाबाई प्रमेश्वर राठोड यांनी पंचायत समिती कार्यालय, लोणार यांच्यासमोर सुरू केलेल्या आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

तांडा समृद्धी योजनेंतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून अवघ्या काही दिवसांतच रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. तसेच सार्वजनिक शौचालयाचे बांधकामही हलक्या व दर्जाहीन साहित्याने करण्यात आल्याने शासन निधीचा सरळसरळ अपहार झाल्याचा गंभीर आरोप नंदाबाई राठोड यांनी केला आहे. सर्व विकासकामांची जिल्हास्तरीय, देऊळगाव कुंडपाळ येथील निष्पक्ष चौकशी करून दोषी ठेकेदार, अभियंते व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. याबाबत यापूर्वी वारंवार लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे नाईलाजाने उपोषणाचा मार्ग स्वीकारल्याचे सौ.राठोड यांनी स्पष्ट केले. न्याय मिळेपर्यंत उपोषण मागे न घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला असून, उपोषण काळात काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. संबंधित उपोषणाची प्रशासनाकडून काय दखल घेण्यात येते याकडे नागरिकांचे लक्ष वेधले आहे.




# शिक्षक संघटनेचे दिलीप कडू यांना सभागृहात पाठवा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४ चंद्रपूर :** शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला आपली ही एकजूट अधिक भक्कम करावी लागेल. सभागृहात आम्ही तीन आमदार आहोतच, पण आता चौथा भक्कम आधार म्हणून दिलीप कडू यांना निवडून देणे, हे आपले कर्तव्य आहे. विदर्भातील ही शिक्षक संघटना आणि आपली ताकद येणाऱ्या काळात निश्चितपणे बदल घडवून आणण्यासाठी अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत शिक्षकांच्या समस्यांची जाणीव असलेला शिक्षक संघटनेचा उमेदवार दिलीप कडू यांना सभागृहात पाठवा व शिक्षकांनी कुठल्याही प्रलोभनाला बळी पडू नका, असे आवाहन आ. धिरज लिंगाडे, आ. सुधाकर अडबाले, आ. अ‍ॅड. अभिजीत वंजारी यांनी केले. राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ज्वलंत विषयांवर चर्चा करून त्यावर प्रभावी उपाययोजना करता यावी म्हणून विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ रोजी संतनगरी शेगाव (जि. बुलढाणा) येथील गणेश प्रस्थ मंगल कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेला होता.




३१ जानेवारी रोजी कार्यकर्ता परिसंवाद पार पडला. त्यानंतर काल १ फेब्रुवारी रोजी मेळावा उद्घाटन व स्मरणिका प्रकाशन सोहळा थाटात पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, उद्घाटक म्हणून आ. धिरज लिंगाडे, मार्गदर्शक म्हणून विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आ. सुधाकर अडबाले, प्रमुख पाहुणे म्हणून आ. अ‍ॅड. अभिजीत वंजारी, विमाशि संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, महा. राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे सल्लागार भोजराज काळे, महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य सरचिटणीस किसन पुंड, आदिवासी आश्रम शाळा शिक्षक संघटनेचे रामदास खवशी, अमरावती शिक्षक मतदार संघाचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, महामंडळाचे पदाधिकारी, जगदीश जुनघरी, महेंद्र सालंकार, विनायक उज्जैनकर, निलीमा मांढरे, विमाशि संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, विजय ठोकळ, जयदीप सोनखासकर, जयप्रकाश थोटे, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, विदर्भ मुख्याध्यापक संघाचे सचिव सुरेंद्र कडू, राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष अनिल भारसाकळे, आशुतोष लांडे, मंगेश पूंडकर, दिलीप शिरभाते आदींची मंचावर उपस्थिती होती.

या मेळाव्यात विमाशि संघाने आजवर केलेल्या कार्याचा आढावा घेणारी 'संघर्ष' या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संपादक प्रभाकर पारखी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दैनिक निर्मल विदर्भ ने काढलेल्या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. आज मराठी माध्यमाच्या शाळा टिकवण्यासाठी शासन स्तरावर उदासीनता दिसत आहे. एकीकडे आपण मराठीला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाल्याचा अभिमान बाळगतो, पण दुसरीकडे मराठी शाळांना वेतनेतर अनुदान मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. २००९ पासून अनेक शाळांना एक रुपयाही वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. शिक्षकांना टीईटी (टीईटी) परिक्षा सक्ती, १४ मार्च २०२४ चा शासन निर्णय (संचमान्यता), शाळेचा विद्यार्थी पट, जुनी पेंशन योजना, टप्पा वाढ अनुदान व इतर शिक्षकांच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करीत ते सोडविण्यासाठी सभागृहात आम्ही तीनही आमदार एकसंघ आवाज उठवित असतो, असे आ. सुधाकर अडबाले म्हणाले. आज मराठी माध्यमाच्या शाळांच्या भवितव्याचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर परिषदेच्या शाळा एकामागून एक बंद होत आहेत. अगदी अनुदानित शाळांची अवस्थाही दयनीय होत चालली आहे.

केंद्र आणि राज्य सरकारचे सध्याचे धोरण असेच राहिले, तर येणाऱ्या २५ वर्षांत ही शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोलमडून पडलेली असेल. मग मध्यमवर्गीय आणि गरिबांची मुले शिकणार कुठे? अशा परिस्थितीत समाज कसा प्रगत होणार? हा मूलभूत प्रश्न आपण सर्वांनी विचारण्याची वेळ आली आहे, अशी टीका आ. अभिजित वंजारी यांनी यावेळी केली. राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, यासाठी आपण सभागृहात सतत आवाज उठवित असून सभागृहाबाहेर देखील सर्वांनी एकजुटीने लढा द्यावा, असे आवाहन आ. धिरज लिंगाडे यांनी बोलताना केले. मेळाव्याचे प्रास्ताविक प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, संचालन संगीता डांगे, नितीन गायकवाड यांनी तर आभार जयदीप सोनखासकर यांनी मानले.

अक्षराज



# कासा फेस्टिव्हलला आजपासून भव्य सुरुवात; तयारी पूर्ण, कासा सज्ज

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५, कासा (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील मध्यवर्ती व महत्त्वाची बाजारपेठ असलेले कासा गाव सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक वारशाने समृद्ध आहे. आदिवासीबहुल ग्रामीण भागातील हे गाव आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी चित्रशैली, पारंपरिक नृत्यप्रकार, खाद्यसंस्कृती, धार्मिक व ऐतिहासिक स्थळांमुळे ओळखले जाते. या सर्व बाबींची व्यापक ओळख जनसामान्यांना व्हावी, तसेच स्थानिक कला-संस्कृतीला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने गेल्या वर्षापासून 'कासा फेस्टिव्हल'ची सुरुवात करण्यात आली.

पहिल्याच वर्षी या फेस्टिव्हलला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. तब्बल तीन लाखांहून अधिक नागरिकांनी उपस्थिती लावत या उपक्रमाला यशस्वी केले होते. त्या यशानंतर यंदाही कासा फेस्टिव्हलचे आयोजन अधिक भव्य आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली सर्व अंतिम तयारी पूर्ण झाली असून, आयोजकांसह कासा पोलिस




प्रशासनाकडूनही कार्यक्रमस्थळाची सखोल पाहणी करण्यात आली आहे.

फेस्टिव्हल दरम्यान नागरिकांच्या सोयीसाठी सुयोग्य वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था, स्वच्छता, सुरक्षेचे नियोजन तसेच विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि हस्तकला व इतर साहित्याचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. या फेस्टिव्हलमुळे स्थानिक व्यावसायिक, कलाकार आणि महिला बचत गटांनाही आर्थिक संधी उपलब्ध होणार आहे.

हा कासा फेस्टिव्हल ०६ फेब्रुवारी ते ०८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून शुक्रवार, ०६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता उद्घाटन समारंभ होणार आहे. या तीन दिवसांच्या महोत्सवात अनेक दिग्गज राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे प्रसिद्ध गायक, कलाकार, टीव्ही मालिकेतील लोकप्रिय चेहरे, लावणी कलाकार तसेच स्थानिक युट्युब कलाकारांचे मनोरंजनात्मक कार्यक्रम प्रेक्षकांचे आकर्षण ठरणार आहेत.

कार्यक्रमाच्या अंतिम पाहणीवेळी कासा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अमर पाटील यांच्यासह आयोजक पांडुरंग बेलकर, हरेश मुकणे, जितू पटेल आणि विपुल राऊत उपस्थित होते. कासा फेस्टिव्हल शांततेत, सुरक्षित आणि उत्साहात पार पडावा यासाठी प्रशासन व आयोजक यांच्यात समन्वयाने नियोजन करण्यात आले आहे. एकूणच कासा फेस्टिव्हलमुळे आदिवासी संस्कृतीला चालना मिळणार असून कासा गावाची ओळख राज्यपातळीवर अधिक ठळकपणे निर्माण होणार आहे.

## थोडक्यात

# वंद्य वंदे मातरम् महानाट्याचा प्रयोग ७ फेब्रुवारीला

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** ज्यांना इतिहासाचे विस्मरण होते ते कधीही इतिहास घडवू शकत नाहीत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. इसवी सन १८५७ ते १९४७ हे भारतीय इतिहासातील एक धगधगते पर्व आहे. हा ९० वर्षांचा काळ भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिलेला आहे. येत्या ०७ फेब्रुवारी रोजी लोकमान्य टिळक स्मारक मंडळा तर्फे याच विषयाला वाहिलेले महानाट्य 'वंद्य वंदे मातरम' सादर होणार आहे. स्मारक मंडळा द्वारा संचालित चंद्रपुरातील लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, लोकमान्य टिळक कन्या विद्यालय आणि लोकमान्य टिळक ज्ञान मंदिरचे सुमारे ६०० विद्यार्थी 'वंद्य वंदे मातरम' हे महानाट्य सादर करणार आहेत. लोकमान्य टिळक विद्यालयाच्या सिव्हिल लाईन इमारतीतील भव्य प्रांगणात शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता हे महानाट्य होणार आहेत. प्रवेश फक्त निमंत्रितांनाच असला तरी उत्सुक नागरिक मंडळाच्या संकेतस्थळावर तसेच शाळांच्या चॅनलवर या महानाट्याचे थेट प्रक्षेपण पाहू शकतात. महानाट्य पाहण्यासाठी संकेतस्थळे अशी आहेत –

https://www.youtube.com/LTSMMANDAL https://www.facebook.com/ltvchandrapur/ https://www.facebook.com/share/1BxBKZ9WkC/ https://www.facebook.com/share/1CCREcDA9G/

# आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, महिला सक्षमीकरणातूनच शेतीचे भविष्य उज्ज्वल - डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

## नेमाने इस्टेट येथे ५ ते ९ फेब्रुवारी कालावधीत कृषीपर्व महोत्सव

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०५, अहिल्यानगर :** आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कृषी प्रक्रिया उद्योगांची उभारणी व महिला सक्षमीकरण या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. त्यातूनच ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, शासनाच्या योजना व बाजारपेठेच्या संधी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारा 'कृषीपर्व' हा उपक्रम शेतीच्या परिवर्तनाचा महत्त्वाचा दुवा ठरेल, असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.

कृषी विभाग, आत्मा, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर व एक्स्पो इंडियन ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेमाने इस्टेट, केडगाव रोड येथे जिल्हास्तरीय कृषी महोत्सव 'कृषीपर्व'चा शुभारंभप्रसंगी पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. यावेळी आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, स्वामी विज्ञानानंद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उमेदचे व्यवस्थापक सोमनाथ जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ.विखे पाटील म्हणाले, कृषी क्षेत्रात सातत्याने होत असलेले बदल व नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या कृषिपर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून, त्याचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचावा यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. गत वर्षापेक्षा या वर्षात आठ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक शेतीक्षेत्रात करण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून



शेती व शेतकऱ्यांना बळकटी देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्यात २५ लाख कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

राहुरी येथील कृषी विद्यापीठातील जागेवर फळ प्रक्रिया उद्योग सुरू करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली असून, हा उद्योग जिल्ह्यात आल्यास फळपीक उत्पादकांना मोठी नवसंजीवनी मिळेल. विषमुक्त शेती व दुष्काळमुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठीही मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहेत. साकळाई योजनेसाठी १ हजार ८०० कोटी रुपयांच्या निधीतून सिंचनाची कामे करण्यात येत आहेत. कुकडी कालव्याचे नूतनीकरण, प्रकल्पावरील चाऱ्यांची कामे, मुळा धरणाच्या पाणी साठवण क्षमतेत वाढ व गोदावरी नदीवरील सिंचनाची कामे वेगाने सुरू आहेत. या माध्यमातून सिंचनक्षेत्र वाढवून राज्य दुष्काळमुक्त करण्याबरोबरच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाण्याची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने निर्णय घेत आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये ८ लाख २५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर १ हजार ५२५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई जमा करण्यात आली आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही देत, जिल्ह्यात पुरस्कारप्राप्त शेतकरी व कृषी विद्यापीठातील विद्यार्थी यांना देशभरात कृषी क्षेत्रात होत असलेले बदल अभ्यासण्यासाठी सहलींचे आयोजन करण्याची सूचना ही त्यांनी केली.

ते पुढे म्हणाले, उमेद अभियानांतर्गत जिल्ह्यात ३० हजार ११२ बचत गट कार्यरत असून, गत तीन वर्षात या गटांना १ हजार ५०० कोटी रुपयांच्या कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. महिला बचत गटांनी स्वावलंबनाची दिशा दाखवून दिली असून त्यांच्या माध्यमातून तयार होणारी उत्पादने दर्जेदार आहेत. अशा उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळणे आवश्यक असून कृषीपर्वासारख्या प्रदर्शनांमुळे महिलांच्या उत्पादनांना ओळख मिळून ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला चालना मिळेल.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, भारत हा कृषिप्रधान देश असून अर्थव्यवस्था कृषीवर अवलंबून आहे. शासनाच्या अनेक योजनांमधून कृषी क्षेत्राला बळकटी देण्यात येत आहे. शेतीक्षेत्रात होत असलेले बदल व नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख या कृषिपर्वातून होईल. हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी पर्वणी ठरेल. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया म्हणाले, कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. कृषी प्रक्रियेवर आधारित उद्योगाला प्राधान्य देण्याबरोबरच महिला बचत गटांना ही प्रोत्साहन देण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, जिल्ह्यात उमेदच्या माध्यमातून ३० हजार ११२ बचत गटांची मोठी चळवळ उभी राहिली आहे. याद्वारे ३ लाख २५ हजार महिला संघटित झाल्या आहेत. उमेद मार्टमध्ये या बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या १८० वस्तूंची नोंदणी करण्यात आली असून, या वस्तू घरबसल्या खरेदी करता येतात. १ लाख ३३ हजार महिला लखपती दीदी बनल्या आहेत. तसेच या बचत गटांना विविध व्यवसाय करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्जाचे वितरणही केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले.

**नेमाने इस्टेट येथे ५ ते ९ फेब्रुवारी कालावधीत कृषी पर्व महोत्सव**

कृषीपर्व महोत्सव केडगाव रोडवरील नेमाने इस्टेट येथे ५ ते ९ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात आधुनिक कृषी अवजारे, ड्रोन तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग तसेच महिला बचत गटांच्या उत्पादनांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. पालकमंत्र्यांनी विविध स्टॉल्सना भेट देऊन पाहणी केली व महिला बचत गटांच्या उत्पादनांचे कौतुक केले. तसेच शेतकरी व उद्योजकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी महिला शेतकरी पुरस्कार, उमेद अभियानातील पुरस्कारार्थी, शासकीय रुग्णालय व क्रीडा पुरस्कार तसेच शेतकऱ्यांना विहिरींसाठीच्या अनुदानाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅटबोटचा शुभारंभही करण्यात आला. या कार्यक्रमास शेतकरी, महिला बचत गटांच्या सदस्य, कृषी उद्योजक, कृषी तज्ज्ञ, विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सारथी तर्फे जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०५, सोलापूर :** जागतिक कर्करोग दिनानिमित्त समाजामध्ये कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने सारथी युथ फाऊंडेशन तर्फे कॅन्सर हॉस्पिटल भेट, मौखिक आरोग्य तपासणी शिबिर व औषध वाटप तसेच शालेय स्तरावर चित्रकला स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे प्रभावी आयोजन करण्यात आले. समाजात वाढत्या कॅन्सर रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर जनजागृतीची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. विशेषतः सोलापूर शहरातील युवकांमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या व्यसनामुळे कॅन्सरचा धोका वाढत असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे अत्यावश्यक ठरले आहे. याच हेतूने २०१३ पासून व्यसनमुक्तीसाठी कार्यरत असलेल्या सारथी युथ फाऊंडेशनने विविध जनहिताचे कार्यक्रम राबविले.कॅन्सर दिनानिमित्त आयोजित मौखिक आरोग्य तपासणी शिबिर व मोफत औषध वाटप कार्यक्रमाचे उद्घाटन कॅन्सरमुक्त झालेल्या निलावती डोळस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी विनायक नगर येथील सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रात नियमित शिबिर आयोजित केले जाईल, अशी माहिती संस्थेचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी दिली.कॅन्सर हॉस्पिटल भेट मागील ५ वर्षांपासून सुरू असलेल्या परंपरेनुसार यावर्षीही कोकिलाबेन धीरूभाई अंबानी कॅन्सर हॉस्पिटल, सोलापूर येथे भेट देण्यात आली. सहभागी नागरिकांना कॅन्सरची गंभीरता, उपचारपद्धती व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या भेटीतून कॅन्सरपासून दूर राहण्याचा व समाजात जनजागृती करण्याचा संकल्प सहभागींकडून करण्यात आला.

चित्रकला स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे दुष्परिणाम समजावेत या उद्देशाने शहरातील विविध शाळांमध्ये चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक चित्रांमधून कॅन्सरविरोधी संदेश प्रभावीपणे मांडला. या उपक्रमासाठी वालचंद महाविद्यालयातील अर्थशास्त्र व समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले. मौखिक आरोग्य तपासणी शिबिर सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रात आयोजित शिबिरात ४२ रुग्णांची डॉ.शिवकुमार वामणे यांनी तपासणी केली. तंबाखूचे व्यसन असलेल्या व मौखिक आजारांची लक्षणे असणाऱ्या रुग्णांना औषधोपचार देण्यात आले. तसेच व्यसनमुक्तीसाठी मोफत समुपदेशनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमांमध्ये एनएमआयएमएस मुंबईचे ऋषी बुरडे, प्रथमेश कोणदे, वालचंद महाविद्यालयातील मुक्ता गायकवाड, महेश रेड्डी, योगेश हसरभावे, व्यंकटेश पंतुवाले, भोलेनाथ जाटब, गणेश पोतदार, तुषार रकम, नौमान कुरेशी, अमीनशाह मकानदार, प्रवीण बाराचारे तसेच सारथी युथ फाऊंडेशनचे स्वयंसेवक कांचन सुरवसे, स्नेहा यरगुंटला, लक्ष्मी शिगरकंटी, अजय इंगळे, अरमान शेख, कुमार लिगाडे यांनी परिश्रम घेतले. कर्करोगमुक्त समाज घडविण्यासाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# सेवा, संवेदना आणि समर्पणाचा दीप विसावला - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** चंद्रपूरातील सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ, संवेदनशील समाजसेवक व पर्यावरणप्रेमी डॉ.गोपाल मुंधडा यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण चंद्रपूर जिल्हा हळहळला आहे. वैद्यकीय सेवेला सामाजिक बांधिलकीची जोड देत त्यांनी आयुष्यभर निःस्वार्थ भावनेने जनसेवा केली. डॉ. मुंधडा हे केवळ नामवंत बालरोगतज्ज्ञ नव्हते, तर दुर्गम व आदिवासी भागातील गोरगरीब जनतेसाठी आधारवड होते. मोफत वैद्यकीय शिबिरे, बालकांचे आरोग्य, महिलांचे आरोग्य, रक्तदान, नेत्रतपासणी अशा विविध उपक्रमांतून त्यांनी हजारो गरजूंना नवजीवन दिले. ४० वर्षा पासून माझे त्यांच्याशी कौटुंबिक संबध होते. अनेकदा माझी त्यांच्याशी भेट होत असे. त्या प्रत्येक भेटीत ते विविध विषयांवर अत्यंत आपुलकीने व दिलखुलास चर्चा करायचे. त्यांच्या बोलण्यातून केवळ ज्ञान नव्हे, तर समाजाबद्दलची खोल संवेदना आणि सामाजिक भान प्रकर्षाने जाणवत असे. गरिबांचे दुःख, बालकांचे आरोग्य, पर्यावरणाची काळजी याबाबत त्यांची तळमळ प्रत्येक संवादात स्पष्ट दिसायची.

कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य, समाजासाठी झटणारा, माणुसकी जपणारा सजग विचारवंत आज आपल्यातून हरपला आहे, ही जाणीव मनाला वेदना देणारी आहे. त्यांच्या जाण्याने सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. समाजासाठी जगणारा एक दीपस्तंभ आपण गमावला आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना व आप्तेष्टांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, हीच प्रार्थना.

# ना प्रचाराला गाडी ना डामडौल.. कधी पायी तर कधी टू व्हीलर घराघरात पोहोचतोय.. मतदारांचा नोकर - महेश तोडकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०५, पाटण (सातारा) :** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी सगळीकडे शेवटच्या टप्प्यात प्रचाराच्या फैरी झडत असताना पाटण तालुक्यातील म्हावशी जिल्हा परिषद गटात मात्तबर उमेदवारांच्या पुढे सर्व सामान्य कुटुंबातील नवखा युवक स्वतः च्या समाज कार्याच्या विश्वासावर कधी पायी चालत तर कधी टू व्हिलर वरुन मतदारांच्या पर्यंत एकटाच पोहचत आहे. या युवका बरोबर प्रचारासाठी ना कार्यकर्ते ना पैसा फक्त सोबत आहे तो प्रामाणिकपणे समाज कार्यातून जनतेचा नोकर बनून त्यांची केलेली सेवा हा आत्मविश्वास मला निवडणूक लढविण्याचे



बळ देत आहे. आणि लोकांच्या सेवेतून मिळालेल्या बळावर मी निवडून येणार असल्याचे ठामपणाणे महेश मारुती तोडकर हा मतदारांना सांगत आहेत.

म्हावशी जिल्हा परिषद गटातून महेश मारुती तोडकर रा. खनोली हा युवक निवडणूकीला अपक्ष उमेदवार म्हणून सामोरे जात आहेत. या गटात यांच्या समोर मातब्बर नेत्यांची उमेदवारी आहे. यातील सातारा जि.प.चे माजी सभापती राजेश पवार भाजपातून तर पाटण तालुका संजय गांधी निराधार योजनेचे तालुका अध्यक्ष भरत साळुंखे हे शिवसेना (शिंदे) यांच्यासह भरत- ढेरे शिवसेना (ठाकरे) अरविंद महाबळ- मनसे हे निवडणूकीचच्या रिंगणात आहेत. यांच्या विषयी बोलताना महेश तोडकर म्हणाले मी कोणाविषयी टीका टीपणी करणार नाही. आजच्या राजकारणाची पातळी खालावली आहे. माझ्याकडे मतदारांना द्यायला पैसे नाहीत. मी मतदारांना जेवण पार्टी देवू शकत नाही. जे उमेदवार मतदारांना पैस्याचे, जेवण पार्टीचे आमिष दाखवतात ते उमेदवार निवडून आल्यानंतर पाच वर्ष मतदारांचे मालक होतात आणि मतदार त्यांच्यापुढे नोकर होतो ही परिस्थिती आहे. मी गेली अनेक वर्ष सर्वसामान्य लोकांची सामाजिक कार्यातून विना मोबदला सेवा केली आहे. हिच सेवा या निवडणुकीतील माझा आत्म विश्वास आहे.

निवडणूकीच्या निमित्ताने मतदारांना भेटायला गेल्यानंतर मला त्यांच्याकडून मिळणारी आपुलकी त्यांचे प्रेम निवडणुकीतील आत्मविश्वास वाढवत आहेत. मतदारांच्या आशिर्वादाने विजयी झालो तर मतदारांचा मालक होण्याचा, पुढारी होण्याचा कधीच प्रयत्न करणार नाही. नेहमीच सामाजिक काम करत असताना जनतेचा नोकर म्हणून शेवटपर्यंत काम करेन असे त्यांनी सांगितले.